# Interdisciplinary International Conference contemporary Issues & Challenges in Social Sciences & Languages

**22nd Sept.2018**

## Organizer

**Deparitment of Political Science,**

**Shri Sahaji Chhatrapati Mahavidyalaya, Kolhapur**

## Special Issue published By

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

**ISSN 2349-638x**

**Peer Review and Indexed Journal**

**Impact Factor 4.574**

**Website www.aiirjournal.com**

**Email :- aiirjpramod@gmail.com**

Scanned with CamScanner

| Sr.No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No. |
|---|---|---|---|
| 82 | डॉ. ललिता सत्यनारायण आय्या | दलित साहित्यापूढील आव्हाने व समस्या | 253 To 256 |
| 83 | डॉ. एल.बी. डोंगरे | राजकीय नेतृत्व : एक विश्लेषण | 257 TO 258 |
| 84 | प्रा. माधवी गोपीनाथराव महाके | वास्तू संवर्धन प्रक्रियेत पूर्नसंस्काराची प्राचीन परंपरा | 259 To 262 |
| 85 | मधुकर खंडू पवार | काश्मीर समस्याः एक ऐतिहासिक विश्लेषण | 263 To 265 |
| 86 | डॉ. मेघा संजय पाटील | मानवी हक्कः स्वरूप व्याप्ती आणि आव्हाने | 266 To 270 |
| 87 | मोहन गणपती हजारे | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने | 271 To 274 |
| 88 | शशिकांत महादेव मोहिते | इतिहासाचा सोयीस्कर अन्वयार्थ : एक आव्हानात्मक मुद्दा | 275 To 278 |
| 89 | जी. टी. मोकासरे | समाजशास्त्रा समोरील समकालीन आव्हाने | 279 To 281 |
| 90 | पांडुरंग विष्णू पाटील | बहुसंस्कृतीवाद आणि समानता | 282 To 284 |
| 91 | प्रा.डॉ.पराग दि.साले | समकालीन इतिहासलेखनासमोरील अडचणी | 285 To 288 |
| 92 | शाकुंतला हरिश्चंद्र फुलवाड | उदगीर परिसरातील हत्तीबेट लयनस्थापत्य : ऐतिहासिक महत्त्व | 289 To 290 |
| 93 | डॉ. आर. पी. चव्हाण शोभा एस्. पाटील | स्त्रीभ्रूणहत्या चिंतेचा व चिंतनाचा ज्वलंत अभिशाप | 291 To 294 |
| 94 | आर.व्ही.पाटील | महाराष्ट्रातील महिला सबलीकरण : एक अभ्यास | 295 To 297 |
| 95 | डॉ. राहूल दत्ता मंडणीकर | लोकशाही समोरील राजकीय गुन्हेगारीकरण | 298 To 301 |
| 96 | रजनी अरुण कारदगे | समलैंगिक विवाह व्यथा आणि वास्तव : समकालीन समस्या | 302 To 304 |
| 97 | आर. के. खोकले | समकालीन सामाजिकशास्त्रा समोरील आव्हाने | 305 To 307 |
| 98 | दिनकर सुदामराव रासवे | दहशतवाद एक जागतिक समस्या | 308 To 310 |
| 99 | रीना रामचंद्र कांबळे | समकालीन समाजातील विरपत्नीच्या समोरील समस्या | 311 To 313 |
| 100 | डॉ. रमाकांत तिडके | भारतातील लहान राज्याच्या मागणीचा प्रश्न आणि नव्या राज्य पुनर्रचनेची आवश्यकता | 314 To 315 |




Scanned with CamScanner

# समाजशास्त्रा समोरील समकालीन आव्हाने

**प्रा. जी. टी. मोकासरे**
सहायक प्राध्यापक,
समाजशास्त्र विभाग, सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव.

शास्त्रीय पध्दतीने मिळवलेल्या घटनांच्या किंवा तथ्यांच्या ज्ञानांचे सुव्यवस्थीत संघटन म्हणजे शास्त्र होयश.श्शास्त्राचे आनुभवनिष्ठ व आकारिक असे दोन प्रकार पडतात. अनुभवनिष्ठ शास्त्राचे परत नैसर्गिक व सामाजिकशास्त्रे असे दोन उपप्रकार पडतात. व्यापक अर्थाने समाजातील माणुस हा सर्व सामाजिकशास्त्रांचा केंद्रबिंदु आहे. मानवाचे सामाजिक वर्तन हे सर्व सामाजिक शास्त्राच्या विषयाच्या अभ्यासाची सामायिक बाजु आहे. समाजशास्त्र हे सुध्दा सामाजिकशास्त्रातील मुलभुत शास्त्र आहे. मानवी वर्तनाचा सामाजिक दृष्टीकोनातून अभ्यास करण्याचे काम समाजशास्त्र करते. मॉरीस गिन्सबर्ग यांच्या मते श्मानवी आंतरक्रीया, आंतरसंबध, त्याची कारणे व परीणाम यांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे समाजशास्त्र होयश.तर किंग्जले डेव्हिडच्या मते श्समाजशास्त्र हे समाजाविषयीचे सामान्य विज्ञान आहेश.

समाजशास्त्राचा उगम हा अलीकडच्या काळात झालेला आहे. सन १८३९ मध्ये ऑगस्ट कॉम्ट यांनी आपल्या पॉझीटीव्ह फिलॉसफी या ग्रंथात ेवबपवसवहल हा शब्द सर्वप्रथम वापरला. त्यामुळे त्यांना समाजशास्त्राचे जनक म्हणून ओळखले जाते. समाजाचा अभ्यासश्शास्त्रीय पध्दतीचा वापर करुनच केला पाहिजे असे त्याचे आग्रही मत होते. कॉम्ट नंतर हर्बट स्पेन्सर, कार्ल मार्क्स, एमिल दुर्खीम, टॉलकाट पार्सन्स, रार्बट मर्टन, मॅक्स वेबर, सी. एच. कुले या विचारवंताच्या योगदानामुळे १९ व्या शतकात समाजशास्त्र एक आधुनिक व प्रगत श्शास्त्र म्हणून नावारुपाला आले.

सर्वच सामाजिक शास्त्रज्ञांनी मानवी समाजाच्या विकासात व प्रबोधनात महत्वाची भूमिका निभावली आहे. औद्योगिक क्रांती, अमेरिकन राज्य क्रांती, फ्रेंच क्रांती, रशियन क्रांती, या सर्व घटना घडण्या पाठीमागे सामाजिकशास्त्रांनी व सामाजिकशास्त्रज्ञांनी महत्वाची भूमिका निभावलेली आहे. परंतु आज २१ व्या शतकात सर्वच सामाजिक शास्त्रांची आवस्था बिकट झालेली आहे. अनेक आव्हानांना त्यांना सामोरे जावे लागत आहे. समाजशास्त्र ही त्याला अपवाद नाही.

## समाजशास्त्रा समोरील समकालीन आव्हाने:

### १. वस्तुनिष्ट संशोधनाचा अभाव:

श्वस्तुनिष्टता म्हणजे तथ्याचे नि:पक्षपणे किंवा तटस्थपणे परीक्षण करण्याची इच्छा आणि योग्यता होयश. सर्वच सामाजिक शास्त्रामध्ये वस्तुनिष्टता आणणे ही काळाची गरज आहे, पण आज सामाजिक संशोधनातील संशोधन मोठया प्रमाणात व्यक्तीनिष्ट असल्याचे आढळून येते. अगदी राष्टीय पातळी वरील काही संशोधन संस्थाच्या संशोधनाची निष्कर्ष ही पक्षपाती असल्याचे दिसते. त्यामुळे सामाजिक संशोधनातील विश्वासहार्यता दिवसेंन दिवस कमी होत आहे. समाजशास्त्रातील अभ्यास हा मानवी वर्तनाशी संबधीत असल्याने व संशोधक हा समाजाचा घटक असल्याने त्याच्यावर श्रध्दा, मूल्य, संसकृतीचा प्रभाव पडतच असतो. तसेच व्यक्ती म्हणून त्याला भावना असतात. या सर्व बाबींचा प्रभाव त्याच्या अध्ययनावर पडत असतो पण संशोधकाने तटस्थ व नि:पक्ष राहायला हवे. तरच संशोधन हे वस्तुनिष्ट होउ शकते.

### २. उपयोजित समाजशास्त्राचा अभाव:

उपयोजित समाजशास्त्र म्हणजे ज्ञानाचा प्रत्यक्ष व्यवहारात उपयोग किंवा व्यवहारातील समस्या सोडवण्यासाठी ज्ञानाचा उपयोग होय. समाजशास्त्र मात्र काय आहे? ; ीूंज पे ढ्ढ याचा अभ्यास करते काय असावे? ;ीूंज ेीवनसक इमद्धयाचा अभ्यास करत नाही. त्यामुळे समाजशास्त्रज्ञ समाजाचा अभ्यास करुन समाजात भविष्यात कोणत्या समस्या निर्माण होतील यावर भाष्य करतांना दिसत नाही. त्यामुळे समाजशास्त्रातील उपयोगीता दिवसेंन दिवस कमी होतांना दिसत आहे. समाजशास्त्रज्ञ हा सोशीयल इंजीनिअर असतो. त्याने समाजात काय असावे, काय नसावे, भविष्यात कोणत्या समस्या निर्माण होतीलघ् त्या कशा सोडवल्या पाहिजे याची उत्तरे



Scanned with CamScanner

समाजशास्त्रज्ञाकडे असायला हवी. अलिकडल्या काळात बर्जर या विचारवंताने उपयोजित समाजशास्त्राचा अग्रह धरल्याचे दिसते आणि त्यासंदर्भात पाउले उचलणे गरजेचे आहे.

**३. रोजगार संधीचा अभाव:**

सद्यस्थितीला विद्यार्थ्यांपुढे रोजगाराचा प्रश्न हा सर्वात मोठा प्रश्न बनलेला आहे. समाजशास्त्रात अनेक विद्यार्थी नेट, सेट, डॉक्टरेट होउनही रोजगार उपलब्ध नाहीत. केवळ प्राध्यापक व ज्युनिअर टिचर हया दोन संधी सोडल्या तर फारशा संधी विद्यार्थ्यांना समाजात उपलब्ध नाहित. त्यामुळे या विषयाकडे विद्यार्थ्यांचा ओघ दिवसेंन दिवस कमी होत चालला आहे. त्याकरीता औद्योगिक समाजशास्त्र, वैद्यकीय समाजशास्त्र, रिसर्च बेस प्रोजक्ट वर्क असे वेगवेगळे घटक अभ्यासक्रमात समाविष्ट करायला हवे जेणे करुन विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी निर्माण होतील.

**४. वर्गातील अनुपस्थिती:**

आज सर्वच सामाजिकशास्त्रातील शिक्षकांपुढील आव्हान म्हणजे वर्गातील अनुपस्थिती हे होय. विद्यार्थ्यांचे प्रवेश तर होतात पण वर्गात मात्र बोटावर मोजण्या एवढेच विद्यार्थी असतात. सामाजिकशास्त्रे म्हणजे घरी बसून व कामधंदा करुन घ्यावयाचे शिक्षण होय अशी विद्यार्थ्यांची धारणा झालेली आहे. याला विद्यार्थी, शिक्षक, व्यवस्था, पालक सर्वच जबाबदार आहेत. रोजगार संधीचा अभाव, व्यावहारिक ज्ञानाचा अभाव, उदासिन शिक्षक यामुळे वर्ग रिकामे व कॉलेज कट्टे हाउसफुल अशी अवस्था झाली आहे. जर ही परीस्थीती बदलली नाही तर काही वर्षांनी हे विषय बंद पडलेले दिसतील.

**५. व्यवसायाभिमुख व कौशल्यवर आधारीत अभ्यासक्रमाचा अभाव:**

शशिक्षण म्हणजे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होयश. परंतु आज सामाजिकशास्त्रातील विद्यार्थी पदवी घेउन जेव्हा बाहेर पडतो तेव्हा त्याला रोजगारही मिळत नाही व तो स्वत:च्या ज्ञानावर एखादा व्यवसाय ही उभा करु शकत नाही. हे आजच्या शिक्षण व्यवस्थेचे अपयश आहे. कारण त्याला तसे व्यवसायाभिमुख व कौशल्यावर आधारीत शिक्षणच दिल्या जात नाही. त्यापेक्षा एखादा निरीक्षर अनुभवी व्यक्ती बाजारात भाजीपाला विकून २०० रुपये कमावतांना दिसतो. त्यामुळे आजच्या विद्यार्थ्यांची अवस्था ना घरका ना घाटका अशी धोब्याच्या कुत्र्या प्रमाणे झालेली आहे.

**६. नाविन्यपुर्ण संशोधचा अभाव :**

स्माजशास्त्रातील बहुतांश संशोधने ही नाविन्यपुर्ण नसतात. समाज जीवन जगत असलेल्या सामान्य व्यक्तीला माहित असलेलीच बहुतांश निष्कर्ष या संशोधनांची असतात.कारण समाजातील सर्वच व्यक्तींना सामाजिक वास्तवतेची जाण असते. सामाजिक संशोधक हिच वास्तविकता शोधण्यासाठी अनेक वर्षे व पैसा खर्च करतात. उदा भारतीय राजकारणावर जातीचा प्रभाव आहे किंवा सावकारी प्रथा व दुष्काळी परीस्थीतीमुळे शेतकरी आत्महत्या करतात. ही निष्कर्ष काढण्यासाठी संशोधकाला दोन, तीन वर्षे संशोधन करावे लागते व त्यात त्याचा पैसा ही खर्च होतो. मात्र समाजातील सामान्य माणसालाही हया गोष्टी आगोदरच माहित असतात. त्यासाठी संशोधकाने काही नाविन्यपूर्ण गोष्टींवर लक्ष केंद्रित करुन नाविन्यपुर्ण गोष्टी शोधून काढायला हव्यात.

**७. पाश्च्यातीकरणाचे अंधानुकीकरण :**

समाजशास्त्रातील बहुतांश संकल्पना व सिध्दांत हे पाश्यात्य देशातील आहेत. त्याचेच आपण सर्वजण अंधानुकरण करत आहोत. भारतीय समाज संस्कृती ही पाश्चात्य देशांपेक्षा वेगळी आहे. त्या अनुशंगाने भारतीय विचारवंतानी भारतीय समाजाचा व संस्कृतीचा अभ्यास करुन वेगवेगळया संकल्पना व सिध्दांची निर्मीती करायला हवी. परंतु तसे फारसे झालेले दिसत नाही. आपण पाश्चात्यांचेच गोडवे गात बसलेलो आहोत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. घुर्ये, एम. एन. श्रिनिवास, ए. आर. देसाई इ. काही विचारवंत सोडले तर इतरांनी केवळ पाश्चात्यांचेच अंधानुकीकरण केलेले दिसते.



Scanned with CamScanner

**निष्कर्ष:**

१. संशोधनातील वस्तुनिष्टतेचा अभाव, नाविन्यपुर्ण संशोधनाची उणिव व अमुर्त सिध्दांतांच्या मांडणीचा अभाव हे भारतीय समाजशास्त्रा समोरील संशोधनाच्या संदर्भात प्रमुख आव्हाने आहेत.

२. व्यवसायाभिमुख किंवा कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रमाचा अभाव व रोजगाराच्या संधीचा अभाव हे समाजशास्त्र व सामाजिकशास्त्रा समोरील विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनातून प्रमुख आव्हाने आहेत.

३. विद्यार्थ्यांची अनुपस्थिती हे शिक्षका समोरचे प्रमुख आव्हान आहेत.

४. पाश्चात्यीकरणाचे अंधानेकीकरण व उपयोजित समाजशास्त्राचा अभाव ही सुध्दा समाजशास्त्रा समोरील महत्वाची आव्हाने आहेत.

५. वस्तुनिष्ट संशोधन, नाविन्यपुर्ण बाबींचा शोध, अमुर्त सिध्दांताची मांडणी, व्यवसायाभिमुख शिक्षण, रोजगाराच्या संधी, विर्ध्यांची अनुपस्थिती यासर्व आव्हानांवर साधक बाधक चर्चा करुण, सकारात्म दृष्टीकोनाने शिक्षणव्यवस्थेत बदल करुन, शिक्षक, पालक व विद्यार्थ्यात सुसंवाद साधून, शिक्षकांमध्ये निकोप संशोधनवृत्ती निर्माण करुन आपण वरील आव्हानांनवर मात करु शकतो.

**संदर्भ:**

१. दोषी, त्रिवेदी ;२००५द्ध, उच्चत्तर समाजशास्त्रीय सिध्दांत, रावत पब्लीकेशन, जयपूर
२. साळुखे, सर्जेराव, ;२००८द्ध, समाजशास्त्रातील मुलभुत संकल्पना, नरेंद्र प्रकाशन, पुणे.
३. बोधनकर, आलोनी, ;१९९८द्ध, सामाजिक संशोधन पध्दती, साईनाथ प्रकाशन नागपूर.
४. डॉ. आगलावे, प्रदिप ;२००७द्ध, अभिजात समाजशास्त्रीय विचार, साईनाथ प्रकाशन नागपूर.



Scanned with CamScanner

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.261

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-research Journal**

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-2018

Special Issue-66

## Society, Culture and Environment

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Dr. Satish Desai
Asso. Prof. Department of Sociology
Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe College,
Miraj, Dist-Sangli [M.S.] INDIA

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY ONLINE RESEARCH JOURNAL

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF)-6.261(2017), (CIF) -3.452(2015), (GIF) -0.676 (2013)
UGC Approved Journal Special Issue 66- October. 2018


| | | | |
|---|---|---|---|
| 53 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक परिवर्तन | आबासाहेब कसबे | 250 |
| 54 | साहित्य, समाज आणि संस्कृती यांचा अनुबंध | डॉ. एम.ए. कव्हळे | 254 |
| 55 | भारतीय समाज आणि सामाजिक समस्या | प्रा. आर. के खोकले | 257 |
| 56 | साहित्य आणि समाज | डॉ. सविता खोकले | 263 |
| 57 | वायू प्रदूषण : एक आव्हान | डॉ. दत्तात्रय खुणे | 265 |
| 58 | सत्यशोधक कथेतील समाजजीवन | पल्लवी कोडक | 269 |
| 59 | माळशिरस तालुक्यातील वीटभट्टी उद्योगाचे पर्यावरणीय परीक्षण | प्रा. डी. ए. कोकाटे | 276 |
| 60 | शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे | डॉ. सौ मंजिरी कुलकर्णी | 280 |
| 61 | जागतिक तापमान वाढीचे शेती क्षेत्रासमोरील आव्हान : एक पर्यावरणीय अभ्यास | डॉ. सी. बी. लोंढे | 282 |
| 62 | आदिवासी समुदायातील कला : एक संस्कृती | डॉ. महेश मगर | 287 |
| 63 | आदिम कोलाम समाज व संस्कृती | प्रा. सौ. श्यामला माने व डॉ. शैलजा माने | 290 |
| 64 | महिला पोलीस आणि सामाजिक परिवर्तन | प्रा. जी. टी. मोकासरे | 295 |
| 65 | आपत्ती व्यवस्थापनात स्वयंसेवक संस्थांची भूमिका | डॉ. माधव मोरे | 298 |
| 66 | भारतीय समाज आणि संस्कृती | प्रा. चांगदेव मुंढे | 303 |
| 67 | स्वयं सहाय्यता बचत गटांच्या मार्फत सामाजिक स्थित्यंतरण | प्रा. दत्तात्रय मुंढे | 306 |
| 68 | मानवी जीवन आणि पर्यावरणातील प्रदूषण | डॉ. जनार्दन परकाळे | 310 |
| 69 | पर्यावरण संरक्षण व शासकीय योजनांचा अभ्यास | प्रा. कलंदर पठाण | 315 |
| 70 | शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासातील योगदान | डॉ. सज्जन पवार | 319 |
| 71 | पर्यावरण संरक्षण व संवर्धनात नागरिकांची भूमिका | प्रा.अरुण पेंटावार व प्रा.आशा पोतलवाड | 323 |
| 72 | पर्यावरण आणि मराठी कविता | प्रा. रमेश रिंगणे | 327 |
| 73 | समाज प्रबोधनकार संत गाडगे बाबा | प्रा. दादा साठे | 331 |
| 74 | महादेव कोळी समाजातील स्त्री संस्कृती | डॉ. विकास शेवाळे | 334 |
| 75 | घिसाडी जमातीच्या कौटुंबिक व विवाह पद्धतीतील बदलते स्वरूप | डॉ. जयसिंग सिंगल | 338 |
| 76 | सामाजिक प्रश्न व पर्यावरण | प्रा. विनायक वनमोरे व प्रा. अशोक खोत | 345 |
| 77 | समाज व संस्कृती | सुरेखा व्हसमने | 348 |
| | **हिंदी विभाग** | | |
| 78 | भारतीय समाज के साहित्य में वर्णित वरिष्ठ नागरिक | डॉ. राजेंद्र बगाटे | 351 |
| 79 | भारतीय संस्कृती : त्यौहार एवं प्रदूषण | डॉ. के. बी. गंगणे | 355 |
| 80 | ग्लोबल वार्मिंग : समस्या और समाधान | डॉ. बी. आर. नळे | 358 |


*या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी स्वतःकडे राखून ठेवलेले आहेत. लेखांचे प्रकाशन वा पुनर्प्रकाशनाचे अधिकार प्रकाशक आणि संबंधित लेखाकाधीन समान असून शोध निबंधातील मते ही संबंधित लेखाच्या लेखकांची वैयक्तिक मते आहेत त्या मताशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.*



Scanned with CamScanner

# महिला पोलीस आणि सामाजिक परिवर्तन

**प्रा. जी. टी. मोकासरे**
समाजशास्त्र विभागप्रमुख,
सुंदरराव सोळंके महाविद्यालय,
माजलगाव. जि. बीड.
Email- gtmokasare@gmail.com
मो. ९९२३३४४९७५

**प्रस्तावणा:-**

भारतात पोलीस व्यवस्था ही पुरुषी वर्चस्व (Male dominated) असलेली व्यवस्था आहे. यामुळे अनेकस्त्रीया अलिकडल्या काळापर्यत पोलीस मध्ये यायाला तयार नव्हत्या. परंतु स्वातंत्र्यानंतर महिलांना अनेक अधिकार मिळाले व त्या अनेक क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने काम करु लागल्या. त्यातल्या त्यात सुरवातीला महिला फक्त काही ठराविकच क्षेत्रातच काम करु लागल्या जसे की, शिक्षिका, डॉक्टर, नर्स इ. नंतर मात्र जागतिकीकरण, आधुनिकीकरण, नागरीकरण या प्रकीयेने भारतात वेग घेतला व त्याचा महिलाच्या जीवनावर प्रभाव पडला. महिलासुध्दा आता अनेक क्षेत्रात पुरूषाच्या बरोबरीने काम करत आहे एवढेच नव्हे,तर काही क्षेत्रात महिलांनी आपली भूमिका पुरूषांपेक्षाही अधिक प्रभावीपणे निभावलेली दिसत आहे. पोलीस व्यवस्थाही त्याला आपवाद नाही. आत्तापर्यंत पोलीस व्यवस्थेत यायला तयार नसलेल्या महिला आता आपले करीअर म्हणून पोलीस वर्दी कडे बघु लागल्या आहेत.

**उद्येश:-**

१. महिला पोलीसांमुळे झालेल्या सामाजिकपरीवर्तनाचा आढावा घेणे.

**अध्ययन पध्दती:-**

सदरील पेपरतयार करण्यासाठी व्दितीय तथ्य संकलन पध्दतीचा वापर करण्यात आला असून संदर्भग्रंथ, शोध प्रंबध, मासिकेइंटरनेटइ. स्त्रोतांचा वापर करुन तथ्य संकलीत करण्यात आलेली आहेत.

**अभ्यासाचे चल:**

सदरील पेपरहा वर्णनात्मक स्वरुपाचा असून यात दोन चलांचा अभ्यास करण्यात अलेला आहे. पोलीस नोकरीहे स्वतंत्र चल (cause)तरसमाज व्यवस्थेत झालेला बदल हे परीवर्तन चल (effect)मानलेले आहे व समाजव्यवस्थेत झालेल्या परीवर्तनाचा आढावा घेतलेला आहे.

**महिला पोलीसांचा इतिहास:-**

महिला पोलीसांचा जागतिक इतिहास बघितला असता असे दिसून येते की, '१८४५मध्ये न्युयॉर्क येथे महिला, मुली, बालकांच्या समस्या व प्रश्न सोडवण्यासाठी Women Matron ची नियुक्ती करण्यात आली. तुरूंगातील महिला बालके यांच्यावर देखरेख ठेवणे हेत्यांचे कामहोते. पुढे १९०३ ला खऱ्या अर्थाने ऑफीसियली दृष्टीकोनातून महिला पोलीसांची नियुक्तीStuttgate {Fedaral Republic of Germany} येथ करण्यात आली'.[१]

'भारतात १९३८ ला कानपूर येथे झालेल्या कामगार संपात महिला मोठया प्रमाणात सहभागी झाल्या होत्या. या संपावर नियंत्रन ठेवतांनासंपातील महिलांवर नियंत्रन ठेवणे पोलीसांना अशक्य झालेहोते. म्हणून पुढे अशी समस्या परत उद्‌भवू नये यासाठी १९३९ ला कानपूर येथे महिला पोलिसांची नियुक्ती करण्यात आली'.[२] ही भारतातील महिला पोलीसांची पहिली नियुक्तीहोती. पुढे स्वातंत्र्यानंतर खऱ्या अर्थानेसंस्थात्मक दृष्टीकोनातून महिला पोलीसांची नियुक्ती व्हायला सुरवात



Scanned with CamScanner

झाली. मात्र जागतिकतुलनेत आजही महिला पोलिसांचे भारतातील प्रमाण खुप कमी आहे. 'सन-२००० ला चीन मध्ये महिला पोलिसांचे प्रमाण ११.२५% होते, स्वीडनमध्ये १७.३%, इस्टोनियात २६%, सिंगापूर १९.१% साउथ आफ्रीका २१.४%, नेदरलँड १७.१% भारत २.२%.'[3] अलिकडच्या काळातील अकडेवारी बघीतली असता भारतात ०१/०१/२०१५ ला १७,२१,१०१ पोलिसांपैकी १,१०,८७२ एवढया महिला पोलीसहोत्या. त्यांचे शेकडा प्रमाण केवळ ६.४४% होते.(BPRD -२०१५)

**महिला पोलीसांमुळे झालेले सामाजिक परीवर्तन:-**

भारतात पुरूषप्रधानसंस्कृती असल्यामुळेप्राचीन काळापासूनचमहिलाचा दर्जानिम्न राहिलेला आहे.स्वातंत्र प्राप्ती नंतर महिलांना अनेक संविधानिक अधिकार प्राप्त झाले व भारतीय महिलाचा दर्जासुधारायला सुरवात झाली. पोलीसहेभारतीय स्त्रीयांसाठी एक असेक्षेत्रआहे जेथे आजही जास्त स्पर्धा नाहित. जागतिकीकरण, आधुनिकीकरण व बदलत्या सामाजिक परीस्थितीमुळे आज अनेकस्त्रीयाहया पोलीस व्यवस्थे मध्येयेत आहे. पोलीस कॉन्सटेबल पासूनते क्लास वन पर्यंतची अनेक पदे निभावतांना भारतीय महिला दिसत आहे. यामुळे महिला केवळ घराच्या बाहेच पडत नसून त्या एक वर्दी घालून बावरत आहे. सुरवातीला महिलांनी वर्दी घालणेहे योग्य मानल्या जात नसे. वर्दी घालणे किंवा पोलीसांची कामे करणेहे केवळ पुरषी कामे म्हणून ओळखल्या जात असे.संरक्षण किंवा लढणेही भूमिका केवळ पुरूषांचीच आहेहेअसेमानले जात होते, पणहे चित्र व भुमिका आज बदलली आहे. अनेक महिला अधिकारीहातात शस्त्र घेवून रनरागीनीसारख्या लढतांना दिसत आहे. याशीवाय महिलांनी रात्रीला घराबाहेर राहून काम करणे अप्रतिष्ठेचे मानले जाई आज अनेक महिला पोलीसस्टेशन व स्टेशन बाहेर रात्रपाळीतसुध्दा बिनधास्तपणे काम करतांना दिसत आहे.त्यामुळे आजच्या स्त्रियांमध्ये कोणत्याही क्षेत्रात कोणत्याही वेळेला काम करण्याची क्षमता व आत्मविश्वास निर्माण होत आहे.

पोलीस व्यवस्थेमध्ये महिला केवळ वर्दी किंवा संरक्षणाचे काम करायला सुरवात झाली असे नाहीतर अनेक महिलांचे नेतृत्व निर्माण झालेले आहेत.अनेक महिला एस.पी. , सी. पी., पी. आय., ए. पी. आय. अशा वेगवगळया पदावर काम करतांना दिसत आहे. कीरण बेदी, मीरा बोरवणकर इ. महिलांनी एक चांगले नेतृत्व पोलीस व्यवस्थेला दिलेले आहे. कीरण बेदी सारख्या स्त्री पोलीस आधिकाऱ्याने तिहारसारख्या जेल मध्ये व कुप्रसिध्द गुन्हेगारांमध्ये अनेकसुधारणा करुन दाखवल्या आहेत. पुर्वी भारतीय समाजात महिलेला दासी म्हणून संबोधल्या जाई. आज मात्र अनेक महिला पोलीस अधिकाऱ्याच्या हाताखाली अनेक पुरूषवर्ग काम करतांना दिसून येत आहे.हा एक मोठा बदल समाजव्यवस्थेत झालेला दिसून येतो.

पोलीस व्यवस्थेत नोकरी लागल्यामुळे महिलांत स्वालंबन वाढले आहे त्या अर्थाजन करत आहे. पती किंवा कुटूबांवर अवलबुन राहण्या एवजी अनेक महिला स्वत: कुटूबांची अर्थव्यवस्था संभाळत आहे. त्याच्यातील आत्मविश्वास त्यामुळे वाढत आहे.महिला पोलीसांचा स्वत: कडे बघण्याच्या दृष्टीकोन बदललेला आहे. 'ज्योतीपोटे यांनी केलेल्या मुबई महिलापोलीसांच्या अध्ययनात असे आढळून आहे की, ६४ टक्के महिला पोलीस नोकरी मुळे स्वत: कडे स्वाभिमानाने बघताहेत असे दिसून आहे.'[4]महिला सबलीकरणाच्या दृष्टीनेहे एक महत्वाचे पाउल आहे.येथे केवळ महिला पोलीसांचेच सबलीकरण होत नाहीतर इतर महिलांचेसुध्दा महिला पोलीसांव्दारे सबलीकरण होत आहे.

'महिला पोलीसांमुळे पोलीस व्यवस्थेला अनेक फायदे झालेले आहेत. त्यामध्ये प्रामख्याने महिलाच्या समस्या सोडवण्याच्या दृष्टीने, बालकांचे प्रश्न सोडवण्यासाठी व वृध्दांचे प्रश्न साडवण्यासाठी पोलीस व्यवस्थेला अनेक फायदे झालेले आहेत.महिल कक्षाच्या माध्यमातून अनेक महिलांचे प्रश्न सोडवण्यात महिला यशस्वी झालेल्या आहेत. पर्वी अनेक महिला आपल्यावरील अन्याय अत्याचार पुरष पोलीसांकडे सांगत नसे मात्र आज अनेक अन्यायग्रस्त महिला आपल्या तक्रारी महिला पोलीसांकडे उघडपणे बोलतांना दिसत आहे. अनेक ठिकाणी महिला गुन्हेगारांना पकडण्यासाठी महिला पोलीसांची भुमिका महत्वाची ठरत आहे. महिला गुन्हेगारांनासंरक्षण देण्यासाठी त्यांना न्यायालयात सादर करण्यासाठीही



Scanned with CamScanner

महिला पोलीस महत्वाची भूमिका निभावत आहे. बालक व बृध्दांच्या समस्या व प्रश्न सोडवण्यात ही पुरूषापेक्षा महिला पोलीसांची भूमिका महत्वाची दिसून येते.'[5]

मागील काही वर्षात महिलांवर होणाऱ्या अत्याच्यारात वाढ झाल्यामुळे महिलासाठी स्वतंत्र पोलीसस्टेशनची मागणी समाजात वाढली होतीत्याअनुशंगाने शासनानेही पाउले उचललेली दिसतात. भारतामध्येकाही राज्यात महिला पोलीसस्टेशनची सुरवात झालेली आहे. भारतात पहिले महिला पोलीसस्टेशनहे केरळ राज्यात सुरू झाले. '०१/०१/२०१५ पर्यत भारतात ५३५ महिला पोलीसस्टेशनहोते. त्यापैकी सर्वाधिक ११९ तमीळनाडु या राज्यात आहेत. उत्तर प्रदेशमध्ये -७१ तर बिहार व राज्यस्थानमध्ये -४० महिला पोलीसस्टेशन आहेत.'[6]जेथे केवळ महिला कर्मचारी असतात व त्या महिलाच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करतात. यामुळे महिला आपल्यावरील अन्याय व अत्याच्यारावर मोकळेपणाने महिला पोलीसांशी बोलु शकतात व महिला पोलीसही इतरांच्या इंअरफेअर शिवाय मोकळे पणाने काम करु शकतात.तसेचमहिला पोलीसांनाआपली कार्यक्षमता अधिक प्रभावीपणे दाखवून देण्याचीसंधी मिळते.

**निष्कर्ष:**

- महिला पोलीस भरतीमुळे अनेक महिलांच्या पारंपारिक दर्जा व भूमिकांमध्ये बदल झालेला आहे. महिला वर्दी घालूनसंरक्षणाची कामे पोलीस व्यवस्थेत करतांना दिसत आहे.
- महिला पोलीसांमुळे महिलांचे एक वेगळे नेतृत्व निर्मान झाले आहे.
- महिला पोलीसांमुळे पोलीस व्यवस्थेला अनेक फायदे झालेले आहेत जसे की महिलांचे आंदोलने नियंत्रन करणे, महिलांच्या समस्या, बालकांचे प्रश्न, वृध्दांचे प्रश्न हे कार्य महिला पोलीस पुरूष पालीसांच्या तुलनेने अधिक चांगल्या प्रकारे करत आहेत.
- महिला पोलीस पारंपारिक भुमिकांच्या बाहेर येवून रनरागीनीसारख्या हातात शस्त्र घेवुन वाईट प्रवृत्ती विरूध्द लढत अहे.
- स्वत: अर्थाजन करत असल्यामुळेमहिला पोलीसांमध्ये स्वावलंब निर्माण होउन आत्वविश्वास वाढत आहे.
- एक अबला नारी एवजी सबला नारीची निर्मीतीहोत आहे.

**संदर्भ ग्रंथ:-**

1. Dr. Mahajan Amarjit, 'Indian Policewomen', Page-35, Deep& Deep Publications, New Delhi.1982.
2. Dr. Vishnoi, Omraj Singh, 'Women Police in India', Page- 40, Arwali Publication New Delhi, 1999.
3. Mangai Natarajan, Women Police in a Changing Society, Page-34, Ashgate Publising, Hampshire,England.(2008)
4. JyotiPote, MumbaitilMahilaPolisanchyaBhumikaaniTantanavYanchaSamajshastriy Abhayas, Page-178, Thesis Sbumitted to N.D.D.W.U.-Oct-2013.
5. Khadijah H.Nasser, 'Policewomen status in the Police Department and Their role in Protecting Women from Violence' Page-41, Published by United Nations Educational Scientific and Cultural Organization-2009.
6. Report of BPRD, on 'Data on Police Organizations in India', Page-133, Published by Bureau of Police Research &Development New Delhi.2015.



Scanned with CamScanner

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VII, Issue-IV
October - December - 2018
Marathi Part - II

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

Scanned with CamScanner

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | भारतातील दहशतवाद, नक्षलवादाचे एक ऐतिहासिक अध्ययन<br>**प्रा. डॉ. गौतम ए. शंभरकर** | १-५ |
| २ | योगशास्त्राची वाढती लोकप्रियता आणि उपयुक्तता<br>**डॉ. बी. एम. सावरकर** | ६-८ |
| ३ | तेलंगणा प्रादेशिकवादाचा भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेवर होणारा परिणाम<br>**घन आनंद लक्ष्मीकांत**<br>**डॉ. विजय यशवंतराव जाधव** | ९-१४ |
| ४ | तलाक कायदा - अपुरे संरक्षण<br>**डॉ. भालेराव जी. पी** | १५-१६ |
| ५ | नक्षलवादाचा आदिवासीच्या आर्थिक जीवनावरील प्रभाव<br>**डॉ. साळुंके जयसिंग ज्ञानदेव** | १७-१९ |
| ६ | महिला पोलिस आणि लिंगभाव<br>**प्रा. काळे आर. बी.**<br>**प्रा. मोकासरे जी. टी.** | २०-२३ |
| ७ | शेतकरी आत्महत्या देशासमोरील एक गंभीर आव्हान<br>**प्रा. डॉ. दिलीप जानकीराम घोंगडे** | २४-२८ |
| ८ | साधना बालकुमार दिवाळी अंक २०१८ मधील कथांमधून आशयातून संस्कारित होणाऱ्या गाभाघटकांचा व मूल्यांचा अभ्यास<br>**डॉ. छाया दिलीप महाले** | २९-३४ |
| ९ | शेतकरी आत्महत्या : कारणे, उपाय व समाजकार्य मध्यस्थी<br>**सहा. प्रा. विकास एन. अड्याळकर** | ३५-३९ |
| १० | स्वयं सहायता बचत गट महिला सक्षमीकरणाचे माध्यम<br>**डॉ. गणेश आर. गाडेकर** | ४०-४३ |
| ११ | स्त्रियांच्या सक्षमिकरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान<br>**प्रा. देविदास नागोराव रिठे** | ४४-४६ |
| १२ | सुखा एक पर्यावरणीय प्रकोप<br>**प्रा. कांबळे डी. एस.** | ४७-५० |

# ६. महिला पोलिस आणि लिंगभाव

**प्रा. काळे आर. बी.**
समाजशास्त्र विभाग प्रमुख, र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई, जि. बीड.
**प्रा. मोकासरे जी. टी.**
समाजशास्त्र विभाग प्रमुख, सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव.

**प्रस्तावना**

पोलिस संघटन हे समाजातील महत्वाची संघटन आहे. समाजव्यवस्थेत नियंत्रन ठेवण्यासाठी ती प्रभा काम करते. त्यामुळे समाजव्यवस्थेत शांतता टिकवून ठेवली जाते व समाजव्यवस्था स्थिर राहण्यास मदत आजच्या आधुनिक समाजव्यवस्थेत तर पोलिस व्यवस्थेचे महत्व दिवसेंन दिवस वाढत चालले आहे. गुन्हेगारीचे प्रमाण, संघटित गुन्हेगार, आतंकवाद, सायबर क्राईम यामुळे पोलीस व्यवस्थेलाही आपले पारंपारिक स्वरुप ब आधुनिकतेची कास धरावी लागली आहे. परंतु आजही आपला समाज व पोलिस व्यवस्था मात्र महिला पोलि बाबतीत फारशी उदार झालेली दिसत नाही. महिला पोलिसांकडे समाजावचा बघण्याचा दृष्टीकोन बदललेला आजही पोलिस व्यवस्था पुरुष प्रभावी (Male dominant) म्हणून ओळखली जाते.

महिला पोलिसांचा जागतिक इतिहास बघितला असता असे दिसून येते की, 1845 मध्ये न्युयॉर्क येथे म मुली, बालकांच्या समस्या व प्रश्न सोडवण्यासाठी Women Matron ची नियुक्ती करण्यात आली. तुरुगातील म बालके यांच्यावर देखरेख ठेवणे हे त्यांचे काम होते. पुढे 1903 ला महिला पोलीसांची नियुक्ती ऑफीसि दृष्टीकोनातून Stuttgate {Fedaral Republic of Germany} येथे करण्यात आली.[1] भारतात 1938 ला का येथे झालेल्या कामगार संपात महिला कामगार मोठया प्रमाणात सहभागी झाल्या होत्या. या संपावर नियंत्रन ठेव संपातील महिलांवर नियंत्रन ठेवणे पोलीसांना अशक्य झाले होते. करीता पुढे अशी समस्या परत निर्माण होउ म्हणून 1939 ला भारतातील पहिल्या महिला पोलीसांची नियुक्ती करण्यात आली.[2]

**उद्येष**

1. महिला पोलिसाच्या संदर्भात होणारा लिंगभेदभाव जाणून घेणे.
2. पोलिस व्यवस्थेतील लिंगभाव संपवण्यासाठी उपाय सुचवणे.

**अध्ययन पध्दती**

सदरील पेपर तयार करण्यासाठी व्दितीय तथ्य संकलन पध्दतीचा वापर करण्यात आला असून संदर्भ शोधप्रबंध, विविध मासिके व इंटरनेट वरील माहिती या स्त्रोतांचा आधार घेण्यात आला आहे.



Scanned with CamScanner

महिला पोलिस आणि लिंगभा

**लिंगभाव**

लिंगभाव ही एक सामाजिक संकल्पना असून तीच्यामध्ये समाजात होणाऱ्या स्त्री पुरुषांच्या भेदभावाचा निर्देष होतो. लिंगभाव ही संकल्पना सर्वप्रथम वापरणारी स्त्रीवादी विचारवंत ॲन ओकले यांच्या मते लिंगभाव ही एक सांस्कृतिक बाब आहे त्यातून स्त्री व पुरुषांची बाईपणात व पुरुषपणात होणारी सामाजिक वर्गवारी सुचीत होते. एखादी व्यक्ती ही स्त्री किंवा पुरुष हे जैविक पुराव्याने ठरते. तर व्यक्तीचे ।

भारतातील पोलिस व्यवस्थेमधील स्त्री पुरुष भेदभाव हा त्यांच्या संख्येवरुनच लक्षात येतो. आज जागतिक तुलनेत भारतातील महिला पोलिसांचे प्रमाण खुप कमी आहे. सन. 2000 मध्ये चीनमध्ये महिला पोलिसांचे प्रमाण 11. 25% होते, स्वीडन मध्ये 17.03%, इस्टोनियात 26%, सिंगापूरमध्ये 19.1%, .साउथ आफ्रीका 21.4%, नेदरलॅंडमध्ये 17. 1% आणि भारतात केवळ 2.2% एवढेच होते.[3] Bureau of Police Research and Development (-२०१५) च्या अहवाला नुसार भारतात 01.01.2015 ला 17,21,101 एकुण पोलीसांपैकी 1,10,872 एवढया महिला पोलिस होत्या. त्यांचे शेकडा प्रमाण केवळ 6.44% होते.

भारतातील महिला पोलीसांचे आकडे बघितल्यावरच असे दिसून येते की, पोलिस व्यवस्थेत स्त्री–पुरुष असमानत आहे. कारण आजही भारतात महिला पोलिसांचे प्रमाण केवळ 6.44% आहे. स्त्री–पुरुष जर एकाच नाण्याच्या दोन बाजु असतील तर त्यांचे प्रमाण समान असायला हवे. कमीत कमी सरकारी नियमाप्रमाणे 33% तरी असायला हवे परंतु सदरील प्रमाण खुपच कमी आहे.

महिला पोलिसांचा दर्जा सुध्दा हा पुरुष पोलीसांपेक्षा निम्न असल्याचे बरेच ठिकाणी दिसून येते. ओम राज सिंह विश्नोइ यांनी केलेल्या दिल्ली येथील महिला पोलीसांच्या (1999) अध्ययनात असे दिसून आले की, 61 टक्के महिला पोलिस त्यांचा दर्जा हा पुरुष पोलिसांपेक्षा निम्न असल्याचा मान्य करतात.

आजही आधुनिक भारतात खुप कमी महिला अशा आहेत की, त्यांना पोलिस क्षेत्रात करीअर करायचे आहे. केवळ नोकरी लागावी , उपजिवीकेचे साधन म्हणून काही महिला आज या क्षेत्रात येत आहे. याशिवाय असे खुपच कमी पालक आहेत ज्याना असे वाटते की, आपल्या मुलींनी पोलीस क्षेत्रात करीअर करावे. उलट ज्यामुलींना या क्षेत्रात करीअर करायचे आहे अशा मुलींना विरोध होतो. कारण समाजात असा अनुभव आहे की, पोलिस व वकील मुलींशी विवाह करण्यास मुले तयार होत नाहित.

रानु सिन्हा यांनी भारत व अमेरिकेतील महिला पोलिसांचा तुलनात्मक अभ्यास केला (2003) त्यात त्यांना असे अढळून आले की, भारतात 16 टक्के महिला पोलीसांचा लैगिक छळ होतो, तर अमेरिकेत 20 टक्के महिला पोलिसांचा लैगिक छळ होता. परंतु भारतात महिला पोलीसाच्या सदर्भात लिंगभेदभाव अधिक प्रमाणात होतो. भारतात 42 टक्के महिला तर अमेरिकेत 24 टक्के महिलांना लिंगभेदभावाचा त्रास होतो.

भारतीय महिला पोलीस विशेषतः शिपाई यांना काम देतांना त्यांना काही काम येतच नाही, महत्वाचे कामे ते करु शकत नाही किंवा पुरुष प्रमाणे त्या काम करु शकत नाही असे टोमने ऐकायला मिळतात. त्यामुळे महिला पोलिसांना वरी ष्टांकडून प्रेशराईज्डही केले जाते.



Scanned with CamScanner

भारतीय महिला पोलीसांच्या संदर्भातील महत्वाचा प्रश्न म्हणजे त्याच्या कामाच्या ठिकाणी असलेल्या सोयी सुविधांचा अभाव होय. अनेक ठीकाणी महिला पोलीसांसाठी स्वतंत्र षौचालये नसतात त्यांना कामाच्या ठिकानी चेंजिंग रुम ची व्यवस्था नसते. एवढेच नव्हे तर बाहेरगावी खेडयात जर डयुटी लागली तर षौचालयाच्या व रात्रीपाळी डयुटी करतांना अनंत अडचणीला सामोरे जावे लागते.

Rough Road to Equality –Women Police in South Asia-2015 या अभ्यासानुसार आशियातील महिला पोलिसांसमोरील प्रमुख आव्हांनामध्ये पुरुष प्रभावी संस्कृती, कामाच्या ठीकाणी होणारा अन्याय, लिंगभेदभाव, मुलभूत सोयी सुविधांचा अभाव यांप्रमुख आव्हानांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. म्हणजेच भारतातच नव्हे तर संपुर्ण आशीयातील महिला पोलीसांना लिंगभेदाचा सामना करावा लागत आहे. महिला पोलिसांना केवळ कार्यालयातच भेदभावाला सामोरे जावे लागते असे नाही तर भारतीय समाजात सुध्दा त्याच्या बददल सकारात्मक वातावरण नाही कारण अनेक संशोधनात असे दिसून आले आहे की, पोलीसाचे काम हे महिलांचे नाही ते काम महिला चांगल्या प्रकारे करु शकत नाही अशीच जनमानसांची धारणा आहे त्यामुळे समाजाचा त्यांना पुर्णतः चांगला पाठींबा मिळत नाही.

याशिवाय शमिम अली यांना Women police and Social change 1889 यांना आपल्या कर्नाटकमधील संषोधनात असे आढळुन आले की, बहुतांश महिलांना त्यांच्या सर्व्हीसमध्ये प्रमोशनच्या संधी मिळाल्या नाहित. तसेच फतिमा रिझवी यांनी आपल्या रिसर्च पेपर Challenges for Women in Indian Police System (2015) मध्ये असे स्पष्ट केले आहे की, आजही पुरुष पोलिस सहकारी महिला पोलिसांना एक पोलिस म्हणून स्वीकाराला तयार नाहीत. यावरुन पुरुषाची हिन मानसिकता दिसून येते.

**सारांष**

पेलीस संघटन हे समाजातिल एक महत्वाचे संघटन असून सामाजिक नियंत्रनाचे महत्वाचे काम ते करते त्यामुळे समाजात शांतता प्रस्थापित होण्यास मदत होते. अशा महत्वाच्या क्षेत्रात महिलांना समान प्रतिनिधीत्व असायला हवे. परंतु आच्या 21 व्या शतकात सुध्दा भारतासारख्या विकसनशील देशात महिला पोलिसांचे प्रमाण हे केवळ 6.44 टक्के आहे. ही देशासाठी लाजीरवाणी बाब आहे. आजही पोलिस क्षेत्र हे Mail Dominant क्षेत्र म्हणून ओळखले जाते. यामध्ये बदल होणे ही काळाची गरज आहे. याशिवाय आहे त्या महिला पोलिसांना केवळ महिला आहे म्हणून लिंगभेदाचा सामना करावा लागतो. मुळात पोलिस हे क्षेत्र महिलाच्या सक्षमीकरणासाठी उत्तम क्षेत्र आहे मात्र तेथेच महिलांचा भेदभाव होणे हे सुध्दा एक स्वार्थी पुरषी मानसिकतेचे लक्षण आहे. महिला पोलिसांचे प्रमाण कमी असणे, सहकारी पुरुषांकडून होणारा भेदभाव, वरीष्टांचे वर्तन, प्रमोशनच्या अडचणी, कामाच्या ठिकाणचे लैगिक शोषण, कामाच्या ठिकाणी असलेल्या सोयी सुविधांचा अभाव हे पोलिस व्यवस्थेतील लिंगभेदाचे प्रमुख घटक आहेत.

जोपर्यत समाजामध्ये आपण महिलांना सन्मांनाचे समान स्थान प्राप्त करुन देत नाही. तोपर्यंत समाज विकसित होउ शकत नाही. त्यामुळे पोलिस व्यवस्थेतही महिलांचे प्रमाण वाढवून, त्यांना समान संधी देवून, त्यांच्या कयशक्तीचा आपण योग्य प्रकारे वापर करुण घेतला पाहिजे, त्यांच्या अडचणी समजून घेवून आपण त्यांचा व देशाचाही विकास करु शकतो.



Scanned with CamScanner

संदर्भ ग्रंथ

1. Dr. Mahajan Amarjit, 'Indian Policewomen', Page-35, Deep& Deep Publications, New Delhi.1982.
2. Dr. Vishnoi, Omraj Singh, 'Women Police in India', Page- 40, Arwali Publication New Delhi,1999.
3. Mangai Natarajan, Women Police in a Changing Society, Page-34,AshgatePublising, Hampshire,England.(2008)

**Other Referances**

1. Jyoti Pote, Mumbaitil Mahila Polisanchya Bhumik aani Tantanav Yancha Samajshastriy Abhayas, Thesis Sbumitted to N.D.D.W.U.-Oct-2013.
2. Khadijah H.Nasser, 'Policewomen status in the Police Department and Their role in Protecting Women from Violence' Published by United Nations Educational Scientific and Cultural Organization-2009.
3. Report of BPRD, on 'Data on Police Organizations in India', Published by Bureau of Police Research &Development New Delhi.2015.
4. Shinha Ranu, AN ENQUIRY INTO THE STATUS OF WOMEN IN POLICE SERVICE : A COMPARATIVE STUDY OF WOMEN POLICE OFFICERS IN INDIA AND USA Thesis submitted to JNU -2003.
5. Rough Road to Equality –Women Police in South Asia-2015, Published by CHRI Organization New Delhi.
6. Shamim Ali, 'Women Police and Social Change' 1989.



Scanned with CamScanner